


साप्ताहिक
www.dongarcharaja.com
वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे




■ वर्ष ९ ■ अंक ४३ ■ गुरुवार, दि. ९ मे २०२४ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-143-2021-2023 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

# बीड जिल्ह्याचे हेच ते दोन वाघ समाजहितासाठी सदैव रस्त्यावर

## अन्याय जिथं:साथ तिथं; शासन-प्रशासनातही वचक; निवडणुकीत समाज साथ देईल?



**डोंगरचा राजा विशेष वृत्त**

महाराष्ट्र राज्यामध्ये आणि विशेषतः बीड जिल्ह्यात सामाजिक प्रश्न पेटतानाचे चित्र अनेक वेळा आपण पाहिलं. या सामाजिक प्रश्नांना कसं हताळायचं आणि समाजाला न्याय मिळवून कसा दिला जाईल यासाठी प्रसंगी कठोर भूमिका घेऊन बीड जिल्ह्यातील बहुजन नेते बाबुराव पोटभरे व युवा रिपाईचे प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे यांची नावे नक्कीच आवर्जुन चर्चिली जातात.

जनतेच्या हक्कासाठी, संघर्ष सर्व सामान्यांच्या न्यायासाठी व संघर्ष सामाजिक विकासासाठी ही वाक्यं निश्चितच समाजातील प्रत्येकांसाठी प्रेरणादायी आहेत असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.अगदी याच जबाबदारीने बहुजन नेते बाबुराव पोटभरे व युवा रिपाईचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांना समाजाच्या सामाजिक,

शैक्षणिक,धार्मिक व प्रसंगी राजकीय क्षेत्रातील घडामोडींचा या दोन्ही संघर्षशिल नेतृत्वाला अभ्यास आहे. आता हे समाजाचे दोन्ही नेतृत्व लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीच्या बॅनरखाली एकत्र आले आहेत. निश्चितच त्यांनी भविष्यातील समाजाच्या विविध विकासात्मक बाबींचा सारासार विचार करून निर्णय घेतला असेल हे नक्की आहे. आता समाजाने देखील आपली भूमिका स्पष्ट करण्याची वेळ आली आहे.एका हाकेला ओ देणारे बीड जिल्ह्यातील हे दोन्ही वाघ एकाच राजकीय व्यासपीठावर आले आहेत.त्यांना साथ द्यावी का न द्यावी. हे देखील तमाम समाज बांधवांनी ठरवण्याची वेळ आली आहे.

बीड जिल्ह्यातच नव्हे तर जिल्ह्याबाहेर कोणत्याही गावात समाजाच्या प्रती कोणतीही घटना घडली तर बहुजन नेते बाबुराव पोटभरे व युवा रिपाईचे प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे दोघांची नावे समाजातील प्रत्येक घटक अभिमानाने आणि तेवढ्यात आत्मविश्वासाने आठवण करतो. अन्यायाला वाचा फोडण्याचे ताकद निश्चितच या दोघांमध्ये आहे. हे देखील महाराष्ट्रातील तमाम जनतेला माहित आहे. महाराष्ट्रातील व विशेषता बीड जिल्ह्यातील वाड्या, वस्त्या ,गावामध्ये राहणाऱ्या समाज बांधवांच्या विविध प्रसंगांना सामोरे जाण्याची धमक या दोघात आहे.बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात व गावागावात या दोघांचेही मजबूत संघटन आहे. समाजातील विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तालुका स्तरावरचे पदाधिकारी हे या दोघांच्या आदेशाचे पालन करून गोरगरिबांना या शासकीय योजनेचा लाभ कसा मिळवून दिला जाईल यासाठी मार्गक्रमण करत ज्या योजना आहेत. त्या पदरात पाडून घेण्यासाठी शासन दरबारी झगडत असतात. निश्चितच अशा प्रसंगी या दोन्ही मातब्बर नेत्यांची गरज वेळोवेळी भासते हे नाकारून चालणार नाही. समाजातील नागरिकांना आपल्या हक्काच्या सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही मंडळी धडपडत असते. त्याचबरोबर आपल्यावर अन्याय अत्याचार होतो.त्यावेळी देखील ही मंडळी धावत पळत आपल्या गावी आपल्या घरी भेटी देतात. व विविध प्रसंगांना सामोरे जातात. मग आता वेळ आली आहे. जो आपल्याला कठीण प्रसंगात साथ देता त्यांना आपल्या माध्यमातून कशी साथ देता येईल याचा विचार निश्चितच बीड जिल्ह्यातील तमाम बहुजन समाज बांधवांना करावा लागणार आहे. बीड जिल्ह्यातील विविध प्रसंग आठवा.. विविध घटना आठवा.. निश्चितच अंगावर शहारे येणारे प्रसंग आपण अनुभवले आहेत. समाजातील नागरिकांच्या मनामनात निर्माण झालेली भीती दूर करण्याचे काम या दोन्हीं वाघांनी केलं आहे. आता या दोन्ही वाघांना साथ देण्याची वेळ समाजावर आली आहे. ज्या माध्यमातून समाजाच्या हितासाठी रात्रंदिवस झगडत राहावं लागणार आहे. ते माध्यम म्हणजे राजकीय माध्यम होय. या राजकीय माध्यमाचा पुरेपूर फायदा कसा करून घेता येईल. यासाठीच या दोन्हीं जिल्ह्यातील मातब्बर नेत्यांनी महायुतीला साथ देण्याचे ठरवले. व त्यानुसार बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना पाठिंबा दिला. या वाघांनी फक्त आणि फक्त तुमच्या विश्वासावर ही जबाबदारी स्वीकारली आहे. आता निर्णय तुमच्या हाती आहे. तुमच्यासाठी एका हाकेला वो देत सैरावैरा धावत तुमची भेट घेणारे महत्त्वाचे कोण आहेत. तुम्हाला साथ देणारे कोण आहेत. वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरणारे कोण आहेत. मग या आपल्या वाघांच्या शब्दाखातर आपण काय करायला पाहिजे. हे देखील ठरवण्याची वेळ आली आहे. अगदी तुमच्यावर विश्वास ठेवून त्यांनी महायुतीच्या लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना शब्द दिला आहे. त्या शब्दाला तडा जाणार नाही. यासाठी तुम्हा सर्वांची बीड जिल्ह्यातील तळागाळातील बहुजन समाज माता,भगिनी व समाज बांधवांची साथ मिळेल या अपेक्षेने हे दोन्हीं वाघ सध्या जिल्ह्यातील विविध ठिकाणी कॉर्नर बैठका घेऊन महायुतीच्या उमेदवारांना म्हणजेच पंकजा मुंडे यांना विजयी करण्याचे आवाहन करत आहेत.

# शरद पवारांनी मराठा आरक्षण चळवळ संपवली:प्रकाश आंबेडकर

## बीडमध्ये वंचितची विराट सभा

### कुठल्यातरी आंदोलनात बजरंग सोनवणे दिसले का?:अशोक हिंगे पाटील






बीड :प्रतिनिधी

पार्लमेंट हे देशाचे सुरक्षा कवच आहे इथे नीतिमत्ता असणारा अशोक हिंगे सारखा उमेदवार निवडून द्या असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर यांनी केले ते आज वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत बोलत होते

पुढे बोलताना ॲड आंबेडकर म्हणाले की शरद पवार म्हणतात भाजपला हरवलं पाहिजे तर मग तुम्ही राजनाथसिहं सोबत काय गुलूगुलू गप्पा मारता देशातील जनतेला मूर्ख बनवायचे प्रताप पवारांनी आता थांबवायला हवेत पवारांचे उमेदवार निवडून दिले तरी ते उद्या भाजपाच्या दावणीला जाऊन बसणार नाहीत याची शाश्वती काय?शरद पवार यांच्या आयाराम गयाराम भूमिकेमुळे मराठा समाजाची प्रतिमा मलिन होत आहे बीडमधून बजरंग सोनवणे यांना निवडून दिले तरी उद्या शरद पवारांच्या सांगण्यावरून सोनवणे मोदींच्या बाजूने जाऊन बसतील कारण राष्ट्रवादीकडे नीतिमता नावाची गोष्ट उरलेली नाही. मराठ्यांचे खरे विरोधक शरद पवारच आहेत असेही प्रकाश आंबेडकर यांनी निक्षुन सांगितले मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन नवीन नाही १९८७ पासून अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजासाठी आंदोलन केली आहेत मात्र सत्तेत असलेल्या शरद पवारांनी मराठा समाजाला कधी गांभीर्याने घेतलेच नाही असे सांगितले तर शरद पवार चळवळ संपविणारा नेता आहे त्यामुळे एका माणसामुळे सकल मराठा समाज बदनाम होत आहे तो होऊ देऊ नका असेही आंबेडकर यांनी मराठा समाजाला सांगितले भारतीय जनता पार्टी सर्वात बरबटलेला पक्ष आहे मोदी घटना विरोधी माणूस आहे आणि सर्वात खोटारडा पंतप्रधान आहे असा पंतप्रधान मी आतापर्यंत पाहिलाच नाही मोदीच्या या अशा वागण्यामुळे देशाची सुरक्षितता धोक्यात असून देश असुरक्षितते कडे वाटचाल करत आहे मोदी देशापेक्षा स्वतःला मोठे समजत आहेत त्यामुळे मोदी आणि आरएसएस प्रणित भारतीय जनता पार्टीला सत्तेपासून दूर ठेवणे गरजेचे आहे असे सांगत देशाची पार्लमेंट (संसद) हे देशाचे सुरक्षा कवच आहे इथे नीतिमता असलेले म्हणजेच अशोक हिंगे सारखे तरुण तडफदार खासदार निवडून जाणे गरजेचे आहे असे मत ॲड प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले.

मराठा आंदोलन, शाही न बाग आंदोलन, रेल्वे आंदोलनात बजरंग सोनवणे दाखवा आणि लाख रुपये मिळवा : अशोक हिंगे पाटील

मराठा आरक्षण आंदोलन, मुस्लिम समाजाचे शाईन बाग आंदोलन, बीड जिल्ह्याच्या रेल्वे प्रश्नावर झालेले आंदोलन यामध्ये कुठेही बजरंग सोनवणे यांचा सहभाग नव्हता असल तर मला दाखवा आणि लाख रुपये मिळवा अशा आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे

पुढे बोलताना हिंगे पाटील म्हणाले शरद पवारांनी माझ्या विरोधात दुसऱ्या पक्षातील उमेदवार आयात करून उभा केला जो उमेदवार स्वतःची कारखानदारी आणि स्वतःची दुकानदारी चालविण्यातच मग्न असतो त्याला जनतेच्या प्रश्नाशी काहीही देणे घेणे नाही आतापर्यंत मराठा आंदोलन झाले, मुस्लिम समाजाचे शाही न बाग आंदोलन झाले, रेल्वेच्या प्रश्नावर अनेक आंदोलने झाली इथे कुठे बजरंग सोनवणे यांचा सहभाग दिसला नाही मी गेल्या अणेक वर्ष मराठा समाजासाठी काम करतो आहे ,

मुस्लिम समाजाच्या शहीन बाग आंदोलनात सहभाग नोंदवला, दलित समाजाच्या न्याय हक्क मागण्यासाठी लढलो मात्र आयत्यावेळी कारखानदारी दुकानदारी चालविणारे उमेदवार समोर येऊन जनतेला मताचे भीक मागत आहेत यांना जनतेकडे मते मागण्याचा कुठलाच अधिकार नाही असेही वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी सांगून येत्या १३ मे रोजी माझ्या नावासमोरील गॅस सिलेंडर चलनाचे बटन दाबून प्रचंड मताधिक्याने विजय करा असे आव्हान केले यावेळी प्रकाश आंबेडकर, उमेदवार अशोक हिंगे पाटील, सर्वजित बनसोडे,विष्णु जाधव, तय्यब जफर, मुजमिल पटेल, रमेश गायकवाड, महेश निनाळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे, शैलेश कांबळे,

ज्ञानेश्वर कवठेकर, डॉ नितिन सोनवणे, धम्मनंद साळवे, अँड.अनिता चक्रे, प्रा.छाया हिरवे, इंजि.विष्णु देवकाते, युनुस शेख, धम्मानंद कासारे, पुरुषोत्तम वीर, बालाजी जगतकर, सुत्रसंचालन अजय सरवदे, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक व सर्व जिल्ह्याचे तालुक्याचे पूर्व व पश्चिम पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्ये उपस्थित होते.

### आरपीआय गवई गटाचा अशोक हिंगे यांना जाहीर पाठिंबा : माणिक वाघमारे

महायुती, महाविकास आघाडी हे दोन्ही पक्ष शेतकरी दिन दलित दुबळे यांची फसवणूक करणारे पक्ष आहेत यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना जाहीर पाठिंबा देऊन संसदेत पाठवणारच असंही माणिक वाघमारे यांनी सांगितले यावेळी ए आय एम चे प्रदेशाध्यक्ष एजाज बाबर आष्टी येथील गोसावी समाजाच्या महिला नेत्या, मुस्लिम समाजाच्या महिला नेत्या यांनी वंचित बहुजन आघाडीचे जाहीर प्रवेश केला



# मी काही घाबरत नाही; तुम्ही दबावाला भीक घालू नका :बजरंग सोनवणे

**डोंगरचा राजा**
**विशेष प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष बीड जिल्ह्याच्या निवडणुकीवर आहे. मी काही घाबरत नाही. तुम्ही दबावाला भीक घालू नका. कुणाला घाबरायची गरज नाही. हा बजरंगबप्पा खासदार होऊन ऊन-वारा-पावसात तुम्हाला साथ देणारच असे रोखठोक मत उमेदवार बंजरग सोनवणे यांनी व्यक्त केले.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये बीड लोकसभेचे उमेदवार बंजरग सोनवणे यांनी मतदारांच्या भेटीगाठी घेऊन मतदारांना साथ देण्याचे आवाहन केले.

ते पुढे बोलताना म्हणाले की,“संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष बीड जिल्ह्याच्या निवडणुकीवर आहे. मी काही घाबरत नाही. तुम्ही दबावाला भीक घालू नका. कुणाला घाबरायची गरज नाही. हा बजरंगबप्पा खासदार होऊन ऊन-वारा-पावसात तुम्हाला साथ देणारच आहे.

त्यामुळे माझ्या पाठीशी समर्थन उभे केले, तर दिल्लीत तुमच्या अडीअडचणी मांडून शरदचंद्र पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण बीड जिल्ह्याचा अभूतपूर्व विकास घडवू,“ असे आवाहन माजलगाव तालुका गावभेट दौऱ्यानिमित्ताने फिरत असताना त्यांनी केले.

माजलगाव तालुक्यातील गावांमध्ये रात्री उशिरापर्यंत नागरिक उमेदवार बंजरग सोनवणे यांच्या स्वागतासाठी जागे होते. तालुक्यातील सादोळा, पुरुषोत्तम पुरी, सुलतानपुर(माळेवाडी), वाघोरा, मालीपारगाव, टाकरवन येथे नागरिकांकडून भव्य स्वागत करण्यात आले.



## संपादकीय

# पुन्हा तोच धडा!

सरकारी वा अनुदानित शाळांच्या एक किलोमीटर परिघात असलेल्या खासगी शाळांत 'शिक्षण हक्क कायद्या'नुसार (आरटीई) प्रवेश न देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने तिथे आपल्या मुलांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या लाखो पालकांच्या आशा उंचावल्या आहेत. आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकांतील बालकांसाठी खासगी शाळांतील २५ टक्के जागा राखीव असतानाही तेथील प्रवेशावर अंतराचे निर्बंध घालण्याचा सरकारचा निर्णय मुळातच शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन करणारा होता. हा निर्णय या कायद्याचा आणखी संकोच करणारा असल्याचे भाष्य 'महाराष्ट्र टाइम्स'ने याच स्तंभातून केले होते.

सहा ते चौदा वयोगटातील बालकांना शिक्षणाचा हक्क बहाल करणाऱ्या कायद्याची व्याप्ती वास्तविक मोठी आहे. मात्र, अनुत्तीर्ण न करण्याची या कायद्यातील तरतूद आणि खासगी शाळांतील २५ टक्के आरक्षण यांपुरताच तो मर्यादित असल्याचा समज झाला आहे. कमी विद्यार्थिसंख्या असलेल्या शाळांचे विलीनीकरण करण्याची राज्य सरकारची भूमिका आणि त्यानंतर खासगी शाळांतील २५ टक्के आरक्षण नाकारण्याचा निर्णय हे शिक्षण हक्क संकुचित करण्याचा प्रयत्न आहेत. उच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे तूर्त या प्रयत्नांना चाप बसेल. सरकारी शाळांकडील विद्यार्थ्यांचा ओघ वाढविण्यासाठी हे पाऊल उचलत असल्याचा युक्तिवाद सरकारने याबाबत केला असला, तरी तो कायद्याच्या चौकटीतील नाही. हीच बाब न्यायालयाने अधोरेखित केली आहे. यानंतर तरी सरकारने शिक्षण हक्काला मर्यादित करण्याचे प्रयत्न थांबवावेत. सरकारी शाळांकडे विद्यार्थ्यांचा ओघ वाढवायचा असेल, तर तेथील पायाभूत सुविधांत भर घालण्यापासून त्यांची गुणवत्ता उंचावण्यापर्यंत आणि शिक्षकांवरील अशैक्षणिक कामे कमी करण्यापासून त्यांना उत्तम प्रशिक्षण देण्यापर्यंतचे प्रयत्न करायला हवेत.

शिक्षण हक्क कायद्यानुसार खासगी शाळांतील प्रवेशाला सरकारी शाळांच्या अंतराची अट घालण्याचे मुख्य कारण आर्थिक आहे. 'आरटीई'नुसार खासगी शाळांत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क संबंधित शाळांना सरकार देते. संपूर्ण राज्यातील 'आरटीई' अंतर्गत प्रवेशाची ही रक्कम सरकारकडून वेळेवर मिळत नसल्याची खासगी शाळांची तक्रार आहे. या शुल्कापोटी हजारो कोटी रुपयांची रक्कम सरकारने थकविल्याचे खासगी शाळांकडून सांगितले जाते. ही थकबाकी वाढू नये, यासाठीही खासगी शाळांमधील 'आरटीई' प्रवेशावर बंधन घातले गेले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांत सर्व सुविधा पुरविल्या जातात, त्यासाठी मोठा खर्च केला जातो; असे असतानाही त्यांकडे पाठ फिरवून मुले खासगी शाळांत जातात, अशी खंत शिक्षण खात्यातील काही अधिकारी व्यक्त करतात. सरकारी शाळा सोडून खासगी शाळांत विद्यार्थी प्रवेश घेत असल्याने अधिक खर्च सोसावा लागतो, अशी त्यांची तक्रारही आहे. आणि याच भूमिकेतून खासगी शाळांतील प्रवेशासाठी सरकारी शाळांच्या अंतराची अट घालण्यात आली. मुळात 'आरटीई'त बालकाच्या घरापासून शाळेपर्यंतच्या अंतराचा उल्लेख आहे. सरकारी शाळेपासूनच्या अंतराचा मुद्दा यात येतच नाही. सरकारकडील थकबाकी वाढत असल्यानेच खासगी शाळांच्या संचालकांनी ही अंतराची अट घालण्याची मागणी केली होती; तसेही अनेक उच्चभ्रू शाळांना 'आरटीई'च्या प्रवेशांना विरोध होता. त्यामुळे अंतराच्या अटीआडून 'आरटीई'चे प्रवेश रोखण्याचा प्रयत्न केला गेला; आणि यामुळे वेगळा निधी द्यावा लागत नसल्याने सरकारने तो उचलून धरला.


या निमित्ताने शिक्षण हक्क कायदा, त्याबद्दलचा राज्य सरकारचा दृष्टिकोन, सरकारी आणि खासगी शाळांतील तफावत, पालकांची मानसिकता आदी अनेक मुद्दे ऐरणीवर आले. समाजात समानता निर्माण करण्यात शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे; परंतु गेल्या काही वर्षांत शिक्षणाचे वस्तूकरण झाले असून, दर्जेदार शिक्षण महाग होत चालले आहे. क्रयशक्ती असणारेच उत्तम शिक्षण 'विकत' घेऊ शकतात, अशी स्थिती आहे. परिणामी शिक्षणाचे साधन विषमतेत भर घालते आहे. 'आरटीई'तील २५ टक्के आरक्षणाच्या तरतुदीने आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांना उत्तम शिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे. खासगी शाळांत 'आरटीई'द्वारे प्रवेश घेतलेले विद्यार्थी आणि अन्य विद्यार्थी असा भेद काही ठिकाणी जाणीवपूर्वक निर्माण केला जात असला, तरी एकंदरीत या तरतुदीचा वंचितांना फायदा होत आहे. ही संधी नाकारण्याचा निर्णय शिक्षण हक्काला छेद देणारा होता. त्याकडेच अंगुलिनिर्देश करून मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. नवा युक्तिवाद करून हा निर्णय पुढे रेटण्याऐवजी 'आरटीई'ची सुयोग्य अंमलबजावणी कशी होईल, याकडे सरकारने आता लक्ष द्यावे. त्याच जोडीने 'आरटीई'ची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि सरकारी शाळांची गुणवत्ता उंचावण्यासाठी गंभीर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

# आपले मन आजारी आहे का?

मित्रांनो आपण डॉक्टर कडे कधी जातो? आपलं शरीर काही कारणामुळे आजारी पडते तेव्हा ना ! आपल्या सर्वांनाच माहित आहे की जसे वातावरनात बदल झाला किंवा चुकीच्या सवयी, चुकीचा आहार व व्यायामाचा अभाव काही साथींचे व संपर्कजन्य आजार सुद्धा दिसून येतात. मग आपण व आपल्या कुटुंबातील व्यक्ती जर आजारी पडली तेव्हा आपण हॉस्पिटलमध्ये जातो जेव्हा आपल्याला त्रास होतो आपल्या शारीरिक वेदना असाह्य होतात.जसे की डोकं जड होणे, पित्त होणे, अर्धशिशी होने,सर्दी-ताप, जुलाब, कंबर दुखी, पाठ दुखी, गुडघेदुखी, हात हातपाय गळून, जाणे चक्कर येणे बीपी, शुगर, अस्थमा, पोटाचे आजार असे अनेक शारीरिक लक्षणे व्यक्तीमध्ये दिसून येतात. तेव्हा आपण लगेच हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांकडे जातो. योग्य तो औषधोपचार घेतो आराम घेतो सांगितल्याप्रमाणे आहार घेतो. दिलेली ट्रीटमेंट व्यवस्थित पार पाडतो.

याच पद्धतीने आपले मन आजारी पडते ही संकल्पनाच आपल्याला रुजत नाही. आपलं मन कुठे आजारी पडत असते का? कारण आपण सहसा आपल्या मनाचा आपण कधी विचारच केलेला नाही कारण आत्तापर्यंत शारीरिक आजाराचे हे मानसिकतेचे प्रतिबिंबच आहे. हे आपल्याला माहित नसावे किंवा आपल्या समाजामध्ये व्यक्ती हे मान्यच करत नाही की माझं मन आजारी आहे. आपलं मन जेव्हा आजारी पडते तेव्हा आपोआपच व्यक्तीमध्ये खालील लक्षणे जाणवतात.

अगदी मोठे मोठे आजार सुद्धा याच मानसिकतेचे प्रतीक आहेत.आपले अस्तित्व निर्माण करत असताना जगण्याची पद्धती, विचारसरणी, आपली दिनचर्या,आपण दुसऱ्याचा कशाप्रकारे विचार करतो या सगळ्या गोष्टी जर नकारात्मक व चुकीच्या असतील तर आपल्याला मनाचे आजार नक्कीच उद्भवतात. मन जेव्हा आजारी पडते तेव्हा मनामध्ये सतत नकारात्मक विचार येऊन सतत, आळस येणे, उदास वाटणे, अस्वस्थ व बेचैनी होणे दैनंदिन कामामध्ये मन न लागणे योग्य निर्णय घेताना न येणे. जेवणाची इच्छा असूनही जेवण न जाने,झोपेच्या तक्रारी, वारंवार बाथरूमला जाणे किंवा जावेसे वाटणे, टेन्शन आलं की भीती वाटते, पोटात गोळा येतो, बारीक ताप आल्यासारखा वाटतो, छातीत जळजळ होते, पोटामध्ये गॅसेस किंवा गोळा आल्यासारखं होणे अति राग राग करणे, सतत चिडचिड करणे, सतत भावनिक होणे, पुन्हा पुन्हा हार्टबीट वाढणे,श्वासस्वच्छ वास वाढतो. थरकाप सुरू होणे, हातापायाला मुंग्या येणे, स्नायू आखणे, मान खांदे जड पडणे, तोंड कोरडे पडणे, गोड खावेसे वाटणे , सतत झोपून राहावंसं वाटणे, कोणत्या कामामध्ये उत्साह न वाटणे, सतत रडू येणे, टेन्शनमध्ये जीवन जगणे, अपराधी आणि एकट वाटणे, नशिबाला दोष देणे, त्रासाच्या वेदना सहन होत नसल्याने व्यसन आणि आत्महत्या सारखे विचार येणे, वरीलक्षणापैकी सहा ते आठ लक्षण जर व्यक्तीमध्ये दिसून येत असतील तर आपले मन आजारी पडलेले आहे. त्याला योग्य उपचाराची गरज आहे म्हणजेच आपलं समुपदेशन करण्याची गरज आहे असे एक ना अनेक लक्षणे मन आजारी पडल्यावर दिसून येत असतात. या लक्षणांची उच्च पातळी झाली तर! गंभीर मानसिक व शारीरिक आजाराला तोंड द्यावे लागते. जसे शारीरिक आजारावर लगेच आपण उपचार करतो तसेच मनावरही उपचार करणे गरजेचे आहे तेव्हाच आपले मन शारीरिक व मानसिक आजारांना आपल्या जवळ येऊ देणार नाही. अशाच प्रकारच्या विविध विषयावरील माहितीसाठी व समुपदेशनासाठी संपर्क साधू शकता.



**समुपदेशक**
**मनीषा बिक्कड (घुले)**
***९५४५४४०४७१***
***९३७०२७४६७५***
**मेंदू विज्ञानावर आधारित मानसशास्त्रीय उपचारक**



# पंकजा मुंडेंना निवडुन आणण्यासाठी वडवणी येथील धनगर समाज एकवटला

वडवणी:प्रतिनिधी

बीड लोकसभा भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना अठरा पगड जाती धर्मातील लोकांचा पाठिंबा मिळत असुन वडवणी तालुक्यातील सकल धनगर समाजानी सुध्दा पंकजाताई मुंडे यांना पाठिंबा दिला आहे पंकजाताई मुंडे यांना निवडुन आणण्यासाठी सकल धनगर समाज एकवटला आहे. जिल्ह्यात अल्पसंख्याकांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व असुन स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांचा वारसा सक्षमपणे चालवण्याचे काम पंकजाताई मुंडे करत आहेत म्हणून त्यांना दिल्लीच्या तख्तावर बसविण्यासाठी वडवणी तालुक्यातील सकल धनगर समाजाने वज्रमूठ आवळली आहे.

दि.३मे २०२४शुक्रवार रोजी धनगर समाजाचे नेते माधव तात्या निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुक्यातील धनगर समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक श्री विठ्ठल बिरुदेव मंदिर येथे संपन्न झाली व या बैठकीत सर्वानुमते पंकजाताईंना निवडून आणण्यासाठी समाजाने निर्धार केला व पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांना समाजाचे भरघोस मतदान देऊन निवडून आणुन लोकसभेत पाठवणार असा निर्णय सर्व समाज बांधवांनी घेतला.

या बैठकीला धारूर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा समाज भूषण माधवतात्या निर्मळ, नगरपरिषदेचे उपाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस प्रदीप नेहकर, वडवणीचे माजी नगरसेवक सतीष बप्पा बडे यांच्या सह या बैठकीला रंगनाथ गंगाराम देशमुख मा.सरपंच पिंपळटक्का, दगडु कानाडे ग्रामपंचायत सदस्य कवडगाव, बद्रीनाथ व्हरकटे मा. सरपंच ढोरवाडी, परशुराम मिसाळ मा.सरपंच परडीमाटेगाव, जगन्नाथ थोरात मा.उपसरपंच ढोरवाडी, ॲड .सुनील डोंबाळे,ॲड.खंडू काळे,

भागवत गिरे, धनगर समाजाचे युवा नेते शहाजी लोकरे, निवृत्ती भले ग्रामपंचायत सदस्य, नवनाथ करे ग्रामपंचायत सदस्य, अनिल नांदुरकर ग्रामपंचायत सदस्य, महादेव तरटे, ज्ञानेश्वर मुसळे,रासपाचे तालुकाध्यक्ष बालाजी काळे, नवनाथ तुरे, संतोष पडुळे, नारायण मिसाळ, दीपक मिसाळ, सुंदर चादर, अविनाश मुसळे, सतिश चिलगर, राम मुसळे, सुखदेव गोरे, बाळू गिरे,सतीष सोनवने,गणेश गिरे, राजेभाऊ गिरे, दत्ता शेजाळ ,राधाकिसन गीरे, उद्धव राऊत, राहुल लोकरे, कृष्णा वाघमारे यासह वडवणी तालुक्यातील सकल धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# ठिय्या आंदोलन करताच वेतन देण्याची मागणी मान्य

माजलगाव:प्रतिनिधी

येथील माजलगांव आमदार प्रकाश सोळंके यांच्याशी संबंधित असलेल्या माजलगाव सहकारी वस्त्रोद्योग औद्योगिक संस्थेच्या कर्मचाऱ्यांना तीन महिन्यांपासून पगार देण्यात आला नव्हता.यामुळे यातील १५० महिला कामगारांनी सोमवार दि.६रोजी मोंढ्यातील गणपती मंदिराजवळील पतसंस्थेत वेतन द्यावे,म्हणून तब्बल दोन घंटे ठिय्या आंदोलन केले.

येथील आमदार सोळंके यांच्याशी संबंधित असलेल्या माजलगाव सहकारी वस्त्रोद्योग औद्योगिक संस्थेचे मोंढ्यात कार्यालय आहे.या संस्थेच्या अध्यक्षा आमदार सोळंके यांच्या पत्नी मंगलाताई सोळंके या आहेत.औद्योगिक वसाहतीत या संस्थेअंतर्गत असलेल्या कारखान्यात पॅन्ट,शर्ट तयार करण्यात येतात.येथे तयार करण्यात आलेला माल ज्या कंपनीस विक्री केला होता,त्या मालास संबंधित कंपनीने मालाची गुणवत्ता चांगली नसल्याने.तो माल घेण्यास नकार दिल्याचा प्रकार एक वर्षापूर्वी घडल्यानंतर कारखाना बंद करण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे.तेव्हा पासुन येथे काम करणाऱ्या ३६० महिला व १५ पुरुष कर्मचारी यांना कामावरून काढण्यात आले. या कामगारांचे तीन महिने वेतन थकले होते.मात्र ते न देताच कामावरून काढण्यात आले होते,असे सांगितले.या सर्व कामगारांचे मिळून जवळपास लाखो रुपये वेतन थकबाकी आहे. यासाठी या महिला कामगारांनी आमदार प्रकाश सोळंके यांच्याकडे दाद मागितली मात्र तरीही पैसे पतसंस्थेतून देण्यात आले नाहीत,असे या महिलांनी सांगितले.अखेर आज सोमवार,६ रोजी १५० महिलांनी व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी या कंपनीचे कार्यालय असलेल्या गणपती मंदिरा जवळील पतसंस्थेत अगोदर आम्हाला वेतन द्या,म्हणून दोन तास ठिय्या आंदोलन केले.अखेर चार दिवसांत तुमच्या एक महिन्याच्या वेतनाची व्यवस्था करू,असे आश्वासन येथील व्यवस्थापक यांनी दिल्यानंतर सदरचे आंदोलन मागे घेण्यात आले.

# बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना विजयी करा:विजय हरगुडे

वडवणी : प्रतिनिधी

दिनांक ८/०५/२०२४ बुधवार रोजी वडवणी शहरात भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चा प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे यांच्या उपस्थित कामगार मोर्चाची कॉर्नर बैठक घेण्यात आली .यावेळी कामगार मोर्चाचा उद्देश केंद्र सरकारने तसेच राज्य सरकारने दिलेल्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवणे आहे. आणि आम्ही त्या पोचवल्या आहेत. सहाजिकच एका कामगाराचे चार जनांचे कुटुंब असा हिशोब धरला तर हजारावर मतदान भाजपा कामगार मोर्चाचे आहे. हे सर्व मतदान पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी असेल अशी ग्वाही भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे यांनी वडवणी येथे झालेल्या कामगार बैठकीत दिली.

हरगुडे पुढे म्हणाले, भाजपा कामगार मोर्चा औद्योगिक कामगार, शेतमजूर, घरेलू तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यांच्या अडीअडचणी आम्ही समजावून घेत आहोत. सहाजिकच १८ वर्ष वयाच्या कामगारापासून महिला व जेष्ठ कामगारांपर्यंतचे प्रश्न आम्ही मार्गी लावत आहोत. उध्याच्या दिनांक १३/५/२०२४ रोजी कमल चिन्हासमोरील बटन दाबून मा.पंकजाताई मुंडे यांना लाखोच्या मताने विजय करा .यावेळी वडवणी बाजार पेठ मध्ये डोर टू डोर व्यापारी , कामगार , बाजारात आलेले नागरिक यांची भेटी घेऊन पंकजाताई मुंडे यांना मतदान करण्याचे आवाहान केले. तसेच भाजपा कामगार मोर्चा बीड जिल्हा उपाध्यक्ष गणेश टकले, जिल्हा सचिव रामेश्वर टिपरे चिंचवण, सतिष आंधळे यांची तालुका उपाध्यक्ष पदी निवड मान्यवराच्या हास्ते नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली.याप्रसंगी दत्तात्रय नन्नवारे , प्रदेश सदस्य अनिता जाधव,विभाग सचिव प्रिती कुकडोजा ,बाजीराव ढाकणे,माजलगाव अध्यक्ष संतोष जाधव , राम माळी, लालासाहेब पन्हाळे, ऋषीकेश स्वामी, नगरसेवक हरिदास टकले, नगरसेवक सुनील ढोले, वडवणी तालुका अध्यक्ष शंकर झाडे, ता. उपाध्यक्ष नारायण जाधव, गणेश टकले, रामेश्वर टिपरे , सतिष आंधळे, बबन खाटोकर, अरुण लोकरे, किरण रेडेकर ,संतोष जाधव,महादेव गुरसाळी , समर्थ झाडे, बाबु चिनके , बाबु महादर ,विठ्ठल गार्डी मोर्चाचे कामगार सदस्य उपस्थित होते.

# ब्रह्मनाथ तांडा येथील नागरिकांचा निवडणुकीवर बहिष्कार!

बीड : प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील ब्रह्मनाथ तांडा या अडीशे ते तीनशे लोक वस्ती असणाऱ्या तांड्यावरील नागरिकांनी तांड्यावरील असुविधा बाबत प्रशासनाला वेळोवेळी निवेदन दिले.

मात्र याची दखल न घेतल्यामुळे तांड्यावरील नागरिकांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला होता. या संदर्भात तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले होते याची माहिती बंजारा समाजाचे नेते व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे व्ही.जे. एन.टी. राज्यप्रमुख रविकांत राठोड यांना मिळताच त्यांनी ब्रह्मनाथ तांडा येथील नागरिकांशी संवाद साधत पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याशी तांड्यावरील लोकांचे

बोलणे करून दिले तांड्यावरील सर्व समस्या लोकसभा निवडणुकीनंतर सोडवल्या जातील असे आश्वासन धनंजय मुंडे यांच्याकडून मिळाल्यानंतर ब्रह्मणाथ तांड्यावरील नागरिकांनी लोकसभा निवडणुकीवर टाकलेला बहिष्कार पाठीमागे घेतला.

मागील २५ वर्षापासून तांड्याला रस्ता नसल्याने अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे याची दखल रविकांत राठोड यांच्यामार्फत पालकमंत्र्यांनी घेतली व भविष्यात कायमस्वरूपी तांड्याला रस्ता देणार असल्याचे आश्वासन दिल्याने लोकसभा निवडणुकीवर घातलेला बहिष्कार ब्रम्हनाथ तांडा येथील नागरिकांनी परत घेतला आहे.

नागरिकांची समजूत घालत निवडणुकावर घातलेला बहिष्कार पाठीमागे घेतल्याबद्दल बंजारा समाजाचे नेते व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व्ही.जे.एन.टी.सेल चे राज्यप्रमुख रविकांत राठोड यांनी गावातील नागरिकांचे आभार मानले

असून पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली गाव तांड्यावरील नागरी व मूलभूत सुविधा लवकरच पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन रविकांत राठोड यांनी दिले आहे.

## प्रचंड,अतिविराट संकल्प महाविजयाचा

गेवराई:प्रतिनिधी

देशाचे प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत अंबाजोगाई जि.बीड येथे भारतीय जनता पक्ष - महायुतीची 'विजय संकल्प' सभा मोठ्या उत्साहात पार पडली.

तत्पूर्वी मोदींचे बीड जिल्ह्यात स्वागत करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. वारकरी संप्रदायाचे प्रतिक असलेला फेटा, शौर्याचे प्रतीक असलेला दांडपत्ता आणि कष्टकरी समाजाची ओळख असलेली घोंगडी-काठी देऊन पंतप्रधान मोदींचा यथोचित सन्मान केला.

बीड जिल्हातील सर्वसामान्य जनतेचा या सभेस मिळालेला अद्भुत आणि अद्वितीय प्रतिसाद हा विजयावर शिक्कामोर्तब करणारा होता.

### जाहीर प्रगटन (वारस प्रमाणपत्र)

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. ०७/०५/२०२४

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, जय ऊर्फ जयश्री भ्र.संजय मगरगट यांनी मोहल्ला गट नं. .. प्लॉट नं. .. सि.टी.सर्व्हे न. मिळकत क्रं. ३१६७ मधील असा असुन त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वः- पी.टी.आर.प्रमाणे, पश्चिमः- पी.टी.आर.प्रमाणे, दक्षिणः - पी.टी.आर.प्रमाणे, उत्तर :- पी.टी.आर. प्रमाणे

आकार : पु.प. ४० फुट व उ.द. ३० फुट एकुण क्षे.१२०० चौ.फुट.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,**
**नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन (वारस प्रमाणपत्र)

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. ०७/०५/२०२४

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, तानाजी दत्तोबा माळी यांनी मोहल्ला गट नं. .. प्लॉट नं. .. सि.टी.सर्व्हे न. मिळकत क्रं. २७३५ मधील असा असुन त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वः- पी.टी.आर.प्रमाणे, पश्चिमः- पी.टी.आर.प्रमाणे, दक्षिणः - प.टी.आर.प्रमाणे, उत्तर :- पी.टी.आर. प्रमाणे

आकार : पी.टी.आर.प्रमाणे

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,**
**नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. ०७/०५/२०२४

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री.प्रभु बापु केकाण यांनी मोहल्ला गट नं. ४२५ प्लॉट नं. ०३ सि.टी.सर्व्हे न. मिळकत क्रं. .. मधील असा असुन त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वः- ०७.६३ मीटर, पश्चिमः- महादेव सातपुते, दक्षिणः -प्लॉट नं.०२, उत्तर :- प्लॉट नं.०४

आकार : लां.पूर्वपश्चिम १२.१९ मी.व रुं.दक्षिणोत्तर ०९.१४ मी. एकुण क्षे.१११.४१ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि. ०७/०५/२०२४

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, १)सुमनबाई भ्र.राजेभाऊ कवचट २)योगेश पि.राजेभाऊ कवचट ३)केशव पि.राजेभाऊ कवचट ४)योगिता पि. राजेभाऊ कवचट यांनी मोहल्ला गट नं. .. प्लॉट नं. .. सि.टी.सर्व्हे न. मिळकत क्रं. २१९६,२३९१ व २७२१ मधील असा असुन त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १)मिळकत क्र.२१९६ | २)मिळकत क्र.२३९१ |
| १)पुर्वः शाळा | २)पुर्व : रशिद अमीन कुरेशी |
| १)पश्चिम : १५ फुट रस्ता | २)पश्चिमःपिंपरखेड रस्ता |
| १ )दक्षिण : बंडू बाबासाहेब | २)दक्षिणःभगवान जनार्धन |
| १)उत्तर :हानुमंत नारायण | २)२०फुटाचा रस्ता |

३)मिळकत क्र.२७२१
२)पुर्व : मोतिराम राठोड
२)पश्चिमःसंजय डोंगरे
२)दक्षिणःगोबु गेमा
२)१० फुटाचा रस्ता

आकार : १)२१९६ :- पुर्वपश्चिम ३५ फुट व दक्षिणोत्तर ३० फुट ज्याचे एकूण क्षे.१०५० चौ.फुट.

२)२३९१ :- पुर्वपश्चिम ३० फुट व दक्षिणोत्तर २० फुट ज्याचे एकूण क्षे.६०० चौ.फुट.

३)२७२१ :- पुर्वपश्चिम ३० फुट व दक्षिणोत्तर १० फुट ज्याचे एकूण क्षे.३०० चौ.फुट.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
गुरुवार, दि. ९ मे २०२४ । पान ३

आपल्या सेवेत प्रथमच वडवणी शहरात
शौनशौर्य जलतरण तलाव व लाकडी तेल घाणा
महात्मा फुले चौक,वडवणी.
8087349612 / 9405349612 / 9146475118

Mo:9923300876
7020546764
महेंद्र एस.उजगरे
विमा प्रतिनिधी
दि न्यु इंडिया इन्शोरन्स कं.लि.
शाखा : परळी वै.
सिरसाळा, ता.परळी वैजनाथ, जि.बीड.

## जिल्ह्यात जलक्रांती करण्यासाठी लोकसभेत पंकजाताईची गॅरंटी हवी :धनंजय मुंडे





अंबाजोगाई :प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात जवळपास सात लाखापेक्षा अधिक हेक्टर शेती ही जिरायती आहे. गोदावरीचे १६५ टीएमसी तुटीचे खोरे भरून काढण्याच्या प्रकल्पास महायुती सरकारने तत्वतः मान्यता दिलेली आहे. हे तुटीचे खोरे भरून काढल्यास बीड जिल्ह्याला किमान ४२ टीएमसी इतके पाणी मिळेल. हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्याने बीड जिल्ह्यातील बहुतांश शेती ही बागायती होणार आहे. या प्रकल्पाचा अंदाजे प्रस्तावित खर्च एक लाख १७ हजार कोटी इतका असून, राज्य व केंद्र सरकारच्या एकत्रित अर्थसहाय्य याचबरोबर अन्य बँकांच्या अर्थसहाय्याने हा प्रकल्प पूर्ण करायचा आहे. त्यासाठी मोदींजींची विकासाची गॅरंटी पंकजाताई जिल्ह्यासाठी पूर्ण करू शकते, असा विश्वास कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज अंबाजोगाई येथे आयोजित विजयी संकल्प सभेत धनंजय मुंडे बोलत होते.

सभेला उपस्थित विराट जनसमुदाय पाहून ही सभा विजयाचा संकल्प करणारी नाही तर पंकजाताईच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी आहे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. बीड जिल्ह्याच्या नावापुढे लागलेला मागासलेपणाचा कलंक पुसून काढण्यासाठी जिल्ह्यातील शेती जलयुक्त करणे, उस तोडणाऱ्या हातांना ऊस उत्पादक बनवणे, इथल्या लोकांना इथेच रोजगार मिळवून देणे, हे आमचे ध्येय असून, यासाठी पंकजाताईला संसदेत पाठवणे आवश्यक आहे, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

दरम्यान बीड जिल्ह्यात रस्ते व रेल्वेचे काम वेगाने सुरू असून, अंबाजोगाईला देखील घाटनांदूर वरून रेल्वेला जोडण्याची आमची अनेक वर्षांची मागणी सुद्धा आगामी काळात पंकजाताई या मोदींजींच्या नेतृत्वात पूर्ण करतील, अशी अपेक्षाही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

मुंडे बंधू भगिनीने मिळून मोदींजींना बांधला फेटा

दरम्यान या सभेस संबोधित करण्यासाठी आलेले देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मराठवाड्याची ओळख असलेला खास फेटा पंकजाताई मुंडे यांनी दिला, फेटा व्यवस्थित न बसल्याचे पाहून धनंजय पुढे सरसावले व तो फेटा धनंजय मुंडे यांनी बांधून व्यवस्थित बसवून दिला.

## बीडकरांचे रेल्वेत बसण्याचे स्वप्न पूर्ण होणार फक्त मुंडे घराण्यामुळेच :केशवराव अप्पाराव आंधळे

वडवणी:प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या रणागंणात उभा असलेल्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा प्रचार हा सर्वसामान्य लोकांनी व बीड जिल्ह्यातील आजी माजी आमदारांनी हातात घेतल्यामुळे एकतर्फी निवडणूक होत आहे असे चिन्ह तयार झाले आहे.

अठरापगड जातीला सोबत घेऊन जाणारा बहुजन समाज आणि त्या बहुजन समाजाचे नेतृत्व करणारी महाराष्ट्रातील एकमेव स्त्री म्हणजे पंकजाताई होय! बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना मिळालेला पिकविमा ही पंकजाताईची ओळख आहे.



जिल्ह्याला मिळालेला विकासनिधी, डिपीडिसी, २५१५ मधील कामे तर सरकार गेले तरी देखील २०२२ पर्यंत २०१९ मधील मंजूर कामे चालू होती एवढा मोठा भरगच्च निधी बीड जिल्ह्याला आणि महाराष्ट्राला पंकजाताईनी दिलेला आहे. म्हणूनच पंकजाताईची ओळख महाराष्ट्रात विकास कन्या म्हणून तयार झाली आहे.

पंकजाताई म्हणजे मास लिडर आहे. ते खेळकर आणि धाडसी व्यक्तीमत्व आहे. बीड जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी पंकजाताई सारख्या व्यक्तीमत्वाची गरज आहे. म्हणून येत्या १३ मे रोजी पंकजाताई यांना मतदान रुपी आशिर्वाद देवून विजयाचे शिल्पकार व्हा असे कळकळीचे अवाहन केशवराव आंधळे यांनी केले आहे.

## परळी येथील ईव्हीएम कार्यान्वित प्रक्रियेची जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केली पाहणी

बीड,: प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघात मतदान सोमवार दिनांक १३ मे रोजी होणार असून यासाठीची जय्यत तयारी सुरू आहे.

सहा विधानसभांमधील मतदान केंद्रानुसार सरमिसळ झालेली असून आता या मशीनचे कमिशनिंग म्हणजेच बॅलेट युनिटमध्ये बॅलेट पेपर लावणे, कंट्रोल युनिट तपासणे आणि व्हीव्हीपॅट कागदाचे रोल तसेच त्याची तपासणी करून सील करण्याची प्रक्रिया सुरू आहे. परळी येथील होत असलेल्या कमिशनिंगच्या ठिकाणी मंगळवारी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परळी विधानसभेचे सहायक निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर व परळीचे तहसिलदार व्यंकटेश मुंडे , नायब तहसिलदार मिलींद गायकवाड, बाबुराव रुपनर, अन्ना वंजारे हे ईव्हीम प्रक्रिया पाहणी करते वेळी सोबत उपस्थित होते.परळी येथे एकुण ३४२ मतदान केंद्राकरिता ३५ टेबलावर सिलींग प्रक्रिया करण्यात आली

या प्रसंगी बीड जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काही ईव्हीम सिलींगबाबत महत्त्वाच्या सूचना करताना सुरक्षात्मक उपायांबद्दल माहिती दिली.

तसेच यावेळी १००० मॉक पोल करिता ५ टक्के या नुसार १८ मतदान केंद्र चिट्ठया राजकीय पक्ष प्रतिनीधीचे उपस्थितीत काढण्यात आल्या. कमिशनिंग नंतर स्ट्राँग रुम मध्ये मशीन सील करून ठेवण्यात येणार आहेत . सिलींग केलेल्या मशीन्स दिनांक १२ मे २०२४ रोजी मतदान केंद्रात मतदान केंद्राध्यक्षासह पाठवण्यात येतील. दिनांक १३ मे रोजी मतदान सुरू होण्याच्या दीड तासापूर्वी उमेदवार यांचे मतदान प्रतिनिधी यांचे समक्ष अभिरुप मतदान घेऊन निवडणूक आयोगाने सांगितलेल

या प्रक्रियेनुसार ईव्हीम मशीनद्वारे प्रत्यक्ष मतदानाला सकाळी ०७ .०० वाजता सुरुवात होईल. ईव्हीएम मशीन्सला हाताळण्याचे तांत्रिक प्रशिक्षण सर्व पथकांना व मतदान अधिकारी यांना दिलेले असून त्याप्रमाणे मतदान सुरळीत पार पडण्यासाठी सर्व आवश्यक व योग्य ती कार्यवाही मतदान दिनांक १३ मे २०२४ रोजी करण्यात यावी, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी उपस्थित अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांना केल्या.





## चेकपोस्टवर पैसे सापडलेल्यांच्या घरी भाजप उमेदवारांचा मुक्काम:बजरंग सोनवणे

गेवराई: प्रतिनिधी

गेवराई चेक पोस्टवर निवडणूक विभागाच्या पथकाने एक कोटी रुपये ताब्यात घेतले होते. ते निवडणुकीसाठी वापरणार असल्याचा संशय आहे. अन त्याच व्यक्तीच्या घरी भाजपच्या उमेदवार मुक्कामाला आहेत असा आरोप बजरंग बप्पा सोनवणे यांनी गेवराई येथील प्रचार सभेत बोलताना केला. तसेच पालकमंत्र्यांच नाव पंतप्रधानांनी सभेत घेतले नाही. हा या जिल्ह्याचा अपमान असल्याची टीका महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केली

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारा निमित्त गेवराई येथे प्रादेशाध्यक्ष जयंत पाटील आणि युवा प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख यांची जाहीर सभा आयोजित करण्यात होती. या सभेला माजी मंत्री राजेश टोपे, माजी मंत्री बदामराव आबा पंडित, माजी मंत्री सुरेश नवले, माजी आमदार उषाताई दराडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप भैया क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम, अजिंक्य चांदणे, दीपकभाई केदार, पूजा मोरे, दयानंद स्वामी धम्मपाल कांडेकर यांच्यासह मित्र पक्षाचे नेते उपस्थित होते.

या सभेत पुढे बोलताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, या जिल्ह्याचे खासदार आणि पालकमंत्री हे नाकर्ते निघाले आहेत. ज्या पालकमंत्र्यांनी भाजपच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी पंतप्रधानांची सभा आयोजित केली. त्या सभेत पंतप्रधानांनी भर सभेत त्यांचे साधे नावही घेतले नाही. हे जिल्हावासियांना लाजिरवाणी गोष्ट आहे. त्याचबरोबर आमदार धस यांच्यावर त्यांनी सडकून टीका करीत त्यांना दम निघत नसून त्यांनी आरोप करताना आणि बोलताना पूर्ण माहिती घेऊन व अभ्यास करावा. असा सल्ला त्यांनी दिला. तसेच बीड जिल्ह्यातील वाळूमफिया ही कोण ? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तसेच खून करण्याचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे गुन्हा यांच्यावर दाखल झाले आहेत. असा आरोपी भाजपच्या प्रत्येक कार्यक्रमात स्टेजवर मिरवत आहे. मात्र त्याला अटक करण्याची पोलिसांची हिम्मत नाही. असे म्हणाले. तसेच मुस्लिम आरक्षणावरून मुस्लिम समाजाला धमकविण्याचा प्रकार घडतोय आणि संविधानिक पदावर राहणाऱ्या व्यक्तीने असे प्रकार करणे गैर आहे. परंतु मी आणि माझा पक्ष आमचा जीव गेला तरी बेत्तर परंतु अल्पसंख्यांक समुदायाच्या बाजूने उभे राहू. असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

गोदावरीचे दोन टीएमसी पाणी आणण्याचा मनोदय व्यक्त केला. तसेच प्रकाश सोळुंके यांच्यावर टीका करताना हे कोकण आणि विदर्भाचे पाणी जिल्ह्यात आणण्याचे खोटे आश्वासन देतात परंतु ते पाणी कसे आणता येईल? हेच त्यांना कळत नाही ते काय विकास करू शकतील ? आणि जिल्ह्याचे पालकमंत्री या जिल्ह्याचे मागासलेपण घालवायचं आहे असे म्हणून स्वतः कबूल करतात म्हणजे त्यांनी स्वतःच स्वतःचे अपयशाची कबुली दिलेली आहे जिल्ह्यातील राज्यकर्त्यांनी जिल्हा मागास का ठेवला? याचे उत्तर द्यायची वेळ आलेली आहे.

मराठा, धनगर आणि मुस्लिम आरक्षणा विषयी बोलताना बजरंग बप्पा म्हणाले की, माननीय मनोज जरांगे पाटील यांची चळवळ आम्हला पुढे न्यायची आहे. जिल्ह्यात स्वतःला ओबीसी म्हणून घेणाऱ्यांनी विविध पदावर एकाच जातीचे अधिकारी आणून बसविले आहेत. शेतकऱ्यांच्या ऊसाला वाढीव भाव देण्यासाठी कारखान्यांनी इथेनॉल निर्मितीचे प्रकल्प चालू केले. परंतु एका रात्रीत हे इथेनॉलचे प्रकल्प बंद करण्याचा आदेश ज्यांनी दिला ते रंगा बिल्ला कोण? म्हणजेच या सरकारला शेतकऱ्याचे भलं झालेलं जमत नाही. असाही आरोप त्यांनी केला. पालकमंत्री स्वतःला कृषी मंत्री आहेत. ते अद्यापही जिल्ह्यात सन २०२० च्या पीक विम्या बद्दल काहीच का बोलत नाहीत.

ज्यांनी कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उसाचे पैसे बुडविले त्यांनी त्या त्या गावात जाऊन सांगावे की का पैसे दिले नाहीत. याचे उत्तर द्यावे . भाजपच्या उमेदवारांना गावागावात अडविले जाते. ते आंदोलक नव्हे तर तुम्ही ज्यांचे पैसे बुडविले ते आडवत आहेत म्हणून भाजपा उमेदवाराने आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचा टोला बजरंग सोनवणे यांनी लगावला. ज्यांना पंधरा वर्षे सत्ता असताना जिल्ह्यात विकास करण्याचा सुचले नाही. त्यांना निवडणुकीच्या तोंडावर जिल्ह्याच्या विकास करण्याचा साक्षात्कार कसा काय झाला ? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. यावेळी बदामराव आबा पंडित, माजी मंत्री राजेश टोपे, महेबुब शेख, माजी मंत्री बदामराव पंडित, जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर, अजिंक्य चांदणे, दीपक केदार यांचीही भाषणे झाली.या कार्यक्रमाला गेवराई तालुक्यातील मतदार यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली असल्याने अनेकांना जागा मिळाली नसल्याने लोक बाहेर व बाल्कनीत बसून सभा ऐकत होते.

## वडार समाजाचा बजरंग बप्पा सोनवणे यांना पाठिंबा; बीडमध्ये मेळावा

बीड : प्रतिनिधी

बीड येथील वडार समाजाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. बीड येथील प्रकाश नगर मध्ये रहिवाशांची दीपक चौगुले यांच्या उपस्थितीत बैतक झाली. बैठकीत या भागात अद्यापही कोणी सार्वजनिक शौचालय, रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सुविधा दिलेल्या नाहीत यावर चर्चा झाली. येत्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना.पाठिंबा देण्याचा त्यांनी सर्वानुमते निर्णय घेतला. कारण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि महाविकास आघाडी ही धर्मनिरपेक्ष असून जातीवादी पक्ष जे संविधान बसल्याची भाषा करून जाती पतीचे राजकारण करतात. समाजात तेढ निर्माण करत आहेत. अशा शक्तींना रोखण्यासाठी बजरंग सोनवणे यांना त्यांनी पाठिंबा दिला आहे.दरम्यान निर्णया नंतर प्रकाश नगर येथे रहिवाशांनी एक बैठक घेतली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, शेकापचे नेते भाई मोहन गुंड, धम्मपाल कांडेकर उपस्थित होते.





समनक जनता पार्टीने उमेदवार बजरंग सोनवणे यांना जाहीर केला. यावेळी बदामराव पंडित, विनायक मुळे आदि.

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि. १ मे २०२४। पान ४

## बबनराव लोनीकरांच्या उपस्थितीत भाजप कार्यकर्त्यांची बैठक

माजलगाव :प्रतिनिधी

लोकसभेच्या निवडणुकीत माजलगाव मतदासंघांतून भाजप उमेदवार पंकजा मुंडे यांना मतांची आघाडी देणार असल्याचा विश्वास भाजप निवडणुक प्रमुख मोहन जगताप यांनी माजीमंत्री बबनराव लोणीकरांच्या उपस्थितीत भाजप कार्यकर्त्यांच्या झालेल्या बैठकीत व्यक्त केला.

भाजप कार्यालयात माजीमंत्री तथा लोकसभा सहनिरीक्षक बबनराव लोणीकरांच्या उपस्थितीत भाजप कार्यकर्त्यांची आढावा बैठक संपन्न झाली.या बैठकीस भाजप नेते तथा विधानसभा निवडणूक प्रमूख मोहन जगताप,डॉ.प्रकाश आनंदगावकर,नितीन नाईकनवरे,भाजप तालुकाध्यक्ष अरुण राऊत, अमरनाथ खुर्पे,डॉ.प्रशांत पाटील ,हनुमान कदम यांची प्रमूख उपस्थिती होती.



## माजी आ.केशवराव आंधळे यांचा प्रचार दौरा

### उमेदवार पंकजा मुंडे यांना विजयी करण्याचे केले आवाहन

वडवणी :प्रतिनिधी

बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ माजी आमदार केशवराव आंधळे यांनी डोंगर पट्ट्यात प्रचार दौरा काढून गावोगावी भेटी दिल्या व लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

याबाबत अधिक वृत्त असे की, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील वडवणी तालुक्यामध्ये डोंगर पट्ट्यात नुकताच माजी आमदार केशवराव आंधळे यांनी लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ नियोजित दौरा करून कमळाचे फूल हे निवडणूक चिन्ह घराघरात पोहोचविण्या बरोबरच या भागातील जनतेला मतदान करण्याची विनंतीही माजी आमदार केशवराव आंधळे यांनी केली आहे. तालुक्यातील डोंगरेवाडी, खाडेवाडी, लोंढेवाडी, तांडा, टोकेवाडी, कारळवाडी सह आदी ठिकाणी कार्नर बैठका घेण्यात आल्या.माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या सोबत या दौऱ्यात भाजप नेते सोमनाथराव बडे, नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, युवा नेते बाबरी मुंडे, अनिल चोले, पांडु अंडील, ईश्वर तांबडे, डॉ.खोटे, महादेव रेडे, अभिमान कदम, डॉ.डोंगरे,गोरख गाडे, बाबाराजे सपकाळ,महादेव सावंत, दराडे बापु,अशोक चोले सह आदी सहभागी झाले होते.



## तुतारीची खरी भिस्त राधाकृष्ण होके पाटील, चंद्रकांत शेजूळ, मनोहर डाके यांच्या खांद्यावर

माजलगाव :प्रतिनिधी

सुरुवातीच्या प्रचारात आघाडीवर असणारे बजरंग सोनवणे यांचे बिनीचे एकएक शिलेदार विरोधकांच्या गळाला लागून नांगी टाकत अर्ध्यात मैदान सोडत असल्यामुळे आता तुतारी ची सर्व मदार शरदचंद्र पवार यांचे जुने सहकारी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांच्या अनुभवी खांद्यावर येऊन पडली आहे.गेल्या चार दशकापासून सतत व्यापक जनाधार बाळगून असणारे होके पाटील यांनी सुद्धा तुतारीला मोठे मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला असून त्या अनुषंगाने होके पाटील गट संपूर्ण माजलगाव मतदारसंघात कामाला लागला असल्याचे मत चंद्रकांत जाधवर यांनी व्यक्त केले आहे..



## सकल चर्मकार समाजाचा पंकजाताई मुंडेंना पाठींबा

माजलगावः प्रतिनिधी

बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना बीड सकल चर्मकार समाजाच्यावतीने आज माजलगावात मेळावा घेत जाहीर पाठींबा देण्यात आला. चर्मकार समाजासाठी भाजपा सरकारने अनेक योजना राबविल्या असून त्याचा फायदा समाजातील विविध घटकांना झालेला आहे. त्यामुळे समाजाने एकमुखाने निर्णय घेऊन पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात महायुतीच्या पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला.

माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात हा मेळावा पार पडला. मेळाव्यासाठी माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव विधानसभा प्रमुख मोहनराव जगताप, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रशांत पाटील, अच्युतराव लाटे, अमरनाथ खुर्पे, कृऊबा सभापती मंगेश तोंडे, संजावनी राऊत, राहुल साळुंके, रविंद्र बोराडे, सुनिता नेटके, शारदा वाघमारे यांची उपस्थिती होती.

माजी मंत्री बबनराव लोणीकर म्हणाले, केंद्रातील भाजपा सरकार हे गोरगरींबांसाठी काम करणारे सरकार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे भारताची मान जगात उंचावलेली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ४०० पारचा नारा देण्यात आला असून त्यासाठी बीडमधून पंकजाताई मुंडे यांना विजयी करावे, असे आवाहन बबनराव लोणीकर यांनी केले.

समन्वयक नानासाहेब घोडके यांनी यावेळी चर्मकार समाजाच्या वतीने अनेक मागण्या केल्या. त्यात प्रामुख्याने संत रोहीदास चर्मोद्योग विकास महामंडळ (लीडकॉम) मागील सर्व कर्ज माफ करण्यात यावे. २०२४ पर्यंतचे कर्ज प्रकरणे निकाली काढून तात्काळ वाटप करण्यात यावेत.

मागासवर्गीयांची अस्वच्छ कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती पुर्ववत चालू करावी. डॉ बाबासाहेब आंबेडकर निर्वाह भत्ता प्रकरणात शहरापासून ७ कि.मी. अंतरावरील अट रद्द करावी. गाव सोडून आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला याचा लाभ मिळावा.

जिल्ह्यात संत रविदास सभागृहासाठी जास्तीत जास्त फंड देण्यात यावा. रमाई घरकूल आवास योजनेची रक्कम वाढवण्यात यावी. गटई स्टॉल मागणी अर्ज दोन वर्षापासून प्रलंबित आहेत, त्याला ताबडतोब मंजूरी देऊन वाटप करण्यात यावेत. आदी मागण्या घोडके यांनी केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष कांबळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, युवक जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, प्रदेश युवा उपाध्यक्ष ॲड.गणेश गवळी, ॲड दत्ता जाधव, सचिन, तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष राजू उनवणे, कर्मचारी जिल्हाध्यक्ष सुनील माने, उपाध्यक्ष बालासाहेब गवळी, प्रभाकर भालशंकर, मधुकर ठोसर, संजय भागवत, प्रसाद वाघमोडे, डीगांबर कांबळे, सुभाष कांबळे, सुभाष कांबळे, विक्की मराठे व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी मंत्री पँथर गंगाधर गाडे यांची शोकसभा

वडवणी :प्रतिनिधी

माजी मंत्री पँथर गंगाधर गाडे यांच्या निधनामुळे वडवणी मध्ये नुकतेच एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.या शोकसभेत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी माजी मंत्री गगांधर गाडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याबाबत अधिक वृत्त असे की माजी मंत्री पँथर गंगाधर गाडे यांच्या निधनामुळे वडवणी मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात नागवंशी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था तथा ॲड.गौतम दादा भालेराव मित्र मंडळ च्या वतीने जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी माजी मंत्री पँथर गंगाधर गाडे साहेब यांच्या वतीने शोकसभा व अभिवादन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली होती. या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्वांचे आभार संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब साळवे यांनी व्यक्त केले.




## चिखलबीड मध्ये तथागत गौतम बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

चिखलबीडःप्रतिनिधी

चिखलबीड या गावी तथागत गौतम बुद्ध व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त प्रबोधनकार मेघानंद जाधव यांच्या बहारदार गीतांची मेजवानी आणि प्रबोधनाचा कार्यक्रम अत्यंत हर्षोल्लासात साजरा झाला.

वडवणी तालुक्यातील चिखलबीड या गावी तथागत गौतम बुद्ध व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध प्रबोधनकार मेघानंद जाधव यांच्या भीम गीतांचा आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी वडवणी तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते.कार्यक्रमास आलेल्या विविध मान्यवरांचे स्वागत सत्कार संयोजन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमास तालुक्यातील व गावातील महिला भगिनी व नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमानंतर गावातील नागरिकांनी व माता भगिनींनी भोजनाच्या आस्वादही घेतला.







## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगाचे प्रेरणास्त्रोत

बीड :प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्माने हजारो वर्षांची गुलामगिरी नाहीशी झाली.त्यांनी भेदभावाच्या गोष्टी समूळ नष्ट करुन, मानवाला त्यांचे हक्क आणि अधिकार मिळवून दिले. चार वर्णात असलेली समाज व्यवस्था संविधानातून मुक्त केली. म्हणून आजचे चित्र पूर्णतः वेगळे आहे.त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ भारताचे नव्हे तर जगाचे प्रेरणास्त्रोत आहेत.असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त खांडवी, कामखेडा, जरुड, धानोरा,रौळसागाव, पालवन चौक येथे जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी पप्पू कागदे बोलत होते. उपस्थितांना संबोधित करताना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ३२ पदव्या संपादित केल्या. त्यांना ११ भाषा बोलता येत होत्या. समाजाला गुलामीतून बाहेर काढण्यासाठी पाच वृत्तपत्रे सुरु केली. अंधश्रध्देत आणि कर्मकांडात अडकलेल्या समूहाला बौद्ध धम्माचा मार्ग दिला. भारताचे संविधान लिहून सर्व मानवजातीचा उद्धार केला. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार आहेत, आणि ते कधीही फेडता येणार नाहीत. एवढे महान कार्य बाबासाहेबानी त्यांच्या आयुष्यात केले. असे प्रतिपादन पप्पू कागदे यांनी व्यक्त केले.यावेळी राजू जोगदंड, किशोर कांडेकर, किसन तांगडे, बबन वडमारे, पुष्पाताई तुरुकमारे, शाम वीर, शेख बिलालभाई, राजू पटेल, गाढे सर, विनोद शेजवळ, अजित सावंत, भैय्या कोरडे, योगेश कोरडे, किरण खेमाडे, रमेश खेमाडे, पप्पू खेमाडे आदींची उपस्थिती होती.















हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड – ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)